UGC Approved Journal
- Research Link
Since March 2002
An International, Registered & Referred Monthly Journal : Political Science
Research Link - 160, Vol - XVI (5), July - 2017, Page No. 61-62
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# भारतीय राज्यघटना - एक आढावा

*भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे ही सरकारला मार्गदर्शन करणारी आहेत. समाजात राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक लोकशाही स्थापन व्हावी. सत्तेवर येणाऱ्या सरकारने मार्गदर्शक तत्वांत रेखाटलेल्या आर्थिक रचनेची अंमलबजावणी करावी, धर्मनिरपेक्ष व समाजवादी समाज स्थापन करावा, अशी यामगची भूमीका होती. मात्र हे ध्येय साध्य करण्याचे मार्ग वेगवेगळे असतील, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते थोडक्यात, मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे परस्परविरोधी नसून ते परस्पर पूरक आहेत, अशीच घटनाकारांची भूमीका होती.*

**डॉ.दिनकर संतुकराव कळंबे**

प्रस्तावना :

भारताच्या सर्व नागरिकांना घटनेने काही मूलभूत अधिकार दिलेले आहेत. भारताने धर्म, जाती आणि वंश याचा विचार न करता सर्वांना नागरिकत्वाचे अधिकार दिलेले आहेत. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना आपला विकास घडवून आणण्यासाठी हे अधिकार दिले आहेत आणि त्याचप्रमाणे काही मुलभूत कर्तव्याही दिले आहेत. भारतीय घटनेने सर्व नागरिकांना कायद्यापुढे समान मानले आहे.

**संशोधन पध्दत :**

ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करून संशोधन करणे दुयम स्त्रोतात प्रकाशित संदर्भ ग्रंथ विविध वार्षीकांक, मासिक व संविधानावर झालेली संसदेतील चर्चा याचा समावेश करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उददेश :**

(1) भारतीय राज्यघटनेचा अर्थ जाणून घेणे.

(2) राज्यघटनेतील मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये अभ्यासने.

भारतीय राज्य घटनेप्रमाणे सर्वांना समानतेचा अधिकार देण्यात आला आहे. धर्म, जाती, वंश आणि जन्मस्थान यांच्या आधारावर कोणताही भेदभाव करता येणार नाही.

**मूलभूत अधिकाराच्या व्याख्या :**

(1) **प्रा. लास्की :** ''अधिकार म्हणजे समाजजीवनाच्या अशा अटी आहेत की, ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वतः चा सर्वांगीण विकास करू शकत नाही.''

(2) **ग्रीन :** ''आंतरिक विकासासाठी अधिकार आवश्यक आहे''.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. भारताच्या राज्यघटनेतील मुलभूत ह हक्काचे स्वरूप दुहेरी आहे.

(1) मुलभूत हक्कांवर नागरिकांना दावा करता यावा म्हणून त्यांना घटनेत स्थान देण्यात आले आहे.

(2) कोणत्याही प्रकारच्या सत्तेवर मूलभुत हक्कांचे बंधन असावे म्हणुन मुलभूत हक्कांना घटनेत सामावुन घेतलेले आहे.

**नागरिकांचे मुलभूत अधिकार :**

सर्वांना विकासाची समान संधी देण्यात येईल. पण सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मागास जाती आणि जमातीसाठी काही विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. समता, शोषणास विरोध, विचार व आभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शैक्षणिक स्वांतत्र्य व न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार हे हक्कांचे सहा प्रकार आहेत.

घटना व्यक्तीस स्वातंत्र्याचा अधिकार देते. यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सभा स्वातंत्र्य आणि संघटना स्वातंत्र्य इत्यादी स्वातंत्र्याचा समावेश होता. त्यात व्यवसाय स्वातन्त्र्याचा समावेश आहे. या आधिकारांचा वापर व्यक्तीने सार्वजनिक आरोग्य, नीतिमत्ता आणि कायदा व सुव्यवस्था यांची मर्यादा पाळुन करायचा असतो. यात व्यक्तीला स्वतःचे वैयक्तिक स्वातंत्र्य रक्षण करण्याचा अधिकार आहे. अटक करण्याविरूध्दही घटनेने काही संरक्षण व्यक्तीला दिलेले आहे. व्यक्तीला त्याच्या शोषणाविरूध्द आधिकार देण्यात आलेले आहेत. वेठबिगार आणि बालमंजूरी विरूध्दची तरतुद यात करण्यात आलेली आहे.

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्याचा आधिकार दिला आहे. प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे धर्म पाळण्याचा आणि त्याचा प्रचार करण्याचा आधिकार आहे. प्रत्येक नागरिकास स्वतःचे धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार आहे. विविध धर्माचे भाआहेत. भारतात धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांना स्वतःच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याचा आधिकार आहे.

लोक आपल्या धर्माचे शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन

*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन, जिला-जालना ( महाराष्ट्र )*

करू शकतात. पण ज्या शैक्षणिक संस्थेस सरकारी मदत मिळालेली आहे, त्या संस्थेत धार्मिक शिक्षण देता येणार नाही. नागरिकांस घटनेने सांस्कृतिक आणि शैक्षणिक आधिकारही प्रदान केलेले आहेत. भारतात धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांना स्वतःच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याचा आधिकार आहे.

सुरूवातीस भारतीय घटनेने नागरिकांस खासगी मालमत्ता संपादन करण्याचा मुलभूत अधिकार दिला होता. पण प्रागतिक सुधारणा करताना या अधिकाराची अडचण येउ लागली. म्हणून 44 व्या घटना दुरूस्तीने हा आधिकार मुलभूत अधिकार म्हणून रदद करण्यात आला. आता ते फक्त कायदेशीर अधिकार आहे. नागरिकांच्या स्वातंत्र्य रक्षणासाठी आणि विकासासाठी मुलभूत आधिकार आवश्यक आहेत. त्यामुळे राज्यघटनेने त्यांना घटनात्मक संरक्षण दिलेले आहेत. आपल्या मुलभूत आधिकारांवर आच येत असेल तर व्यक्ती सरकार विरूध्द न्यायालयात दाद मागु शकते. व्यक्तीचे अधिकार महत्वाचे असुन समाजहितासाठी त्यावर काही बंधने लादण्यात आलेली असली तरी व्यक्तीने त्याबाबत जागृत राहावे, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुचवतात.

भारतीय घटनेने नागरिकास समतेचा, स्वातंत्र्याचा आणि आणि जीवीताचा आधिकार दिलेला आहे. हे अधिकार कलम 14,19 व 21 प्रमाणे दिले आहेत. आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने या आधिकारांना सुवर्ण त्रिकोण असे संबोधले आहे. मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने जीवीत राहण्याचा अधिकार हा शिक्षणाचा व काम करण्याचा अधिकार मिळाल्याशिवाय अर्थपुर्ण होत नाही, असे मत मांडले आणि त्यानुसार घटनादुरूस्ती करून शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य करण्यात आला. व्यक्तीचे जीवन सर्वागाने विकसित करण्यासाठीच तिला समतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरूध्द दाद मागण्याचा व शैक्षणिक आणि धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे.

राज्यघटनेने आपल्या घटनेमध्ये व्यक्तीच्या अधिकाराबरोबरच व्यक्तीच्या कर्तव्यांचापण समावेश 42 व्या घटनादुरूस्तीप्रमाणे केला आहे. कारण हक्क व कर्तव्ये हया एकाच नाण्याच्या दोन बाजू समजण्यात येतात. पण या मूलभूत कर्तव्यांना घटनात्मक संरक्षण देण्यात आलेले नाही. त्यामुळे जर नागरिकाने जर आपले कर्तव्य बजावले नाही, तर त्याच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही.

या कर्तव्यात राष्ट्रीय चळवळीतून निर्माण झालेल्या मूल्यांचे संगोपन करणे, सार्वजनिक मालमत्ता आणि महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे व अवशेष यांचे संरक्षण करणे, भारतातील सर्व लोकांत बंधुत्वाच्या भावनेचा प्रसार व प्रचार करणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेस प्रतिकुल असणा–या रूढी व परंपरा यांचा त्याग करणे, शास्त्रीय दृष्टीकोण, मानवतावाद व समाज सुधारणा यांचा स्वीकार करणे ही महत्वाची कर्तव्ये आहेत. व्यक्तीने आपल्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत उत्कृष्ट प्रकारचे काम करून राष्ट्राचे नाव उज्वल करावे, हे व्यक्तीचे मुलभूत कर्तव्य मानव्यात आले आहे.

**भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे :**

भारतीय राज्यघटनेने सरकारला मार्गदर्शन करणा–या काही तत्वांचा चौथ्या भागात समावेश केला आहे. ही मार्गदर्शक तत्वे आपल्या राज्यघटनेच्या –हदयस्थानी असून सरकारच्या कारभारात मार्गदर्शन करण्याचे काम ते करतात. राज्यघटनेत स्पष्टपणे असे नमूद करण्यात आले आहे की, हया तत्वांना जरी न्यायालयीन संरक्षण देण्यात आले नसले तरी देशाच कारभार चालवित असतांना त्यांचे महत्व अनन्य साधारण असे आहे. म्हणून कायदे करीत असतांना सरकारने ही तत्वे लक्षात घेतली पाहिजेत. कारण सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायावर आधारलेला समाज निर्माण करणे हे राज्यघटनेचे उद्दीष्ट आहे.

मार्गदर्शक तत्वे ही महत्वाची असली तरी त्यांना घटनात्मक सरंक्षण देण्यात आलेले नाही. याचा अर्थ असा की, तत्वे अंमलात आणण्यासाठी आपण न्यायालयात दाद मागू शकत नाही. पण ही तत्वे उद्याचे अधिकार आहेत. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले.

यातील काही तत्वांची आपण अंमलबजावणी केली. शिक्षण घेण्याचा अधिकार आपण मूलभूत अधिकार केला. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्थाना घटनात्मक दर्जा दिला व कार्यकारी व न्यायालयीन अधिकार विभक्त केले.

**मूल्यामापन :**

हक्क व कर्तव्ये ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मूलभूत हक्कांना घटनात्मक संरक्षण आहे पण मुलभूत कर्तव्यांना घटनात्मक संरक्षण देण्यात आलेले नाही. म्हणून जर नागरिकाने आपले कर्तव्य बजावले नाही, तर त्याच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही.

भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे ही सरकारला मार्गदर्शन करणारी आहेत. समाजात राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक लोकशाही स्थापन व्हावी. सत्तेवर येणा–या सरकारने मार्गदर्शक तत्वांत रेखाटलेल्या आर्थिक रचनेची अंमलबजावणी करावी, धर्मनिरपेक्ष व समाजवादी समाज स्थापन करावा, अशी यामागची भूमीका होती. मात्र हे ध्येय साध्य करण्याचे मार्ग वेगवेगळे असतील, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते थोडक्यात, मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे परस्परविरोधी नसून ते परस्पर पूरक आहेत, अशीच घटनाकारांची भूमीका होती.

***संदर्भ :***

*(1) आंबेडकर, डॉ. भीमराव रामजी : The Constitution of India, भारत सरकार, विधी व न्याय मंत्रालय नवी दिल्ली.*

***(2)** भोळे, डॉ. भा.ल. : भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळपूरे पब्लिशर्स नागपूर.*

***(3)** देवगाकर, डॉ. एस.जी. : भारतीय राजकीय व्यवस्था, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

***(4)** विभूते, डॉ. भालबा : भारतीय संविधान, मनोविकास प्रकाशन, चर्चगेट मुंबई.*

***(5)** भोगले, डॉ. एस.के. : भारताचे शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.*

❁❁